महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com www.facebook.com/maharashtra.c.times Info@maharashtracrimetimes.com Twitter- @MHCrimeTimes Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: ०३ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २० एप्रिल २०२१ ते सोमवार २६ एप्रिल २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

"मनात नेहमी जिंकण्याची आशा असावी, कारण नशीब बदलो न बदलो... पण वेळ नक्कीच बदलते!"

# महाराष्ट्रात कडक लॉकडाउन? दोन दिवसांत होणार निर्णय

**मुंबई (योगेश होळंब)- राज्यात ३० एप्रिलपर्यंत कडक निर्बंधांची घोषणा करण्यात आली आहे. मात्र परिस्थिती अद्यापही नियंत्रणात आलेली दिसत नाही. दैनंदिन रुग्णसंख्या वाढत असून राज्य सरकारची चिंता वाढली आहे. दरम्यान राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी राज्यात पुन्हा एकदा लॉकडाउन लागण्याचे संकेत दिले आहेत.**

मुख्यमंत्री दोन दिवसांत यासंबंधी निर्णय घेतील अशी माहिती त्यांनी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत दिली. दिल्लीत नुकताच सहा दिवसांचा लॉकडाउन जाहीर करण्यात आलेला असून कशा पद्धतीने अमलबजावणी होणार आहे याची माहिती घेत असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.

'संचारबंदीचा फायदा सध्या पाहिजे त्या प्रमाणात दिसत नाही. आपण लॉकडाउन केलेला नाही. अनेक व्यापाऱ्यांचा लॉकडाउनला विरोध होता. पण आज व्यापारी किंवा जीवनाश्यक वस्तूंची तसंच इतर लहान दुकानं असणारेही लॉकडाउन १०० टक्के करा अशी मागणी करत आहे. अनेक जिल्ह्यांमध्येही लोक मागणी करत असून आम्ही मुख्यमंत्र्यांना यासंबंधी माहिती दिली आहे. दोन दिवसांत कडक लॉकडाउनसंबंधी निर्णय अपेक्षित आहे. मुख्यमंत्री इतरांशी चर्चा करुन तो निर्णय घेतील,' असं विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं आहे.

'करोनाच्या दुसऱ्या लाटेनं अंदाज चुकवला. सगळ्यांना वाटत होतं, लाट सौम्य येईल पण ही लाट तीव्र निघाली. कोणालाच याची कल्पना नव्हती,' असं विजय वडेट्टीवार म्हणाले आहेत. विजय वडेट्टीवार यांनी यावेळी करोनाच्या लढाईसाठी ठाकरे सरकारने साडे पाच हजार कोटी रुपये राखीव ठेवले असल्याची माहिती दिली. 'कोविड रोखण्यासाठी आरोग्य यंत्रणा बळकट करायची असेल किंवा रेमडेसिवीर घ्यायचं असेल, ऑक्सिजन प्लांट लावायचा असेल, बेड्स वाढवायचे असतील या सगळ्यासाठी ३३०० कोटी आणि आमदारांना एक कोटी त्यांच्या निधीतून खर्च करायचा आहे. याशिवाय इतर स्त्रोतही आहेत,' असं विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं. 'केंद्र सरकारने एसडीआरएफमध्ये कोविडसाठी पैसे दिलेले नाहीत.



## थोडक्यात

### राहुल गांधींनंतर आता ममता बॅनर्जींची घोषणा, निवडणूक प्रचाराबाबत मोठा निर्णय

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** देशात झपाट्यानं होत असलेल्या कोरोनाच्या प्रसाराचा परिणाम पश्चिम बंगालमधील निवडणुकीवरही होण्यास सुरुवात झाली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यानंतर आता तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीदेखील निवडणुकीसाठी घेण्यात येणाऱ्या रॅलींबाबत मोठी घोषणा केली आहे. त्यांनी



सांगितलं, की इतर टप्प्यातील मतदानासाठी त्या निवडणूक प्रचार करणार नाहीत. टीएमसी खासदार डेरेक ओ ब्रायन यांनी ट्विट करत याबाबतची माहिती दिली आहे, की ममता बॅनर्जी आता कोलकोतामध्ये निवडणूक प्रचार करणार नाहीत. डेरेक ओ ब्रायन यांनी ट्विट करत सांगितलं, की बंगाल निवडणुकीच्या दरम्यान कोरोना ज्या वेगानं वाढत आहे ते पाहाता मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आता कोलकातामध्ये प्रचार करणार नाहीत.

### संजय गायकवाडांना फडणवीसांचे प्रत्युत्तर, म्हणाले, 'माझ्या तोंडात विषाणू घालण्याआधी'

**मुंबई (प्रतिनिधी)-** राज्यात कोरोना विषाणूच्या दुसऱ्या लाटेमुळे हाहाकार उडालेला असताना आणि सर्वसामान्य जनता त्रस्त असताना राज्यातील सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये टीका आणि आरोप-प्रत्यारोपांचे सत्रही जोरात सुरू आहे. काल विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी 'मला कोरोनाचे जंतू सापडले असते, तर मी ते फडणवीसांच्या तोंडात कोंबले असते, असे विधान केले होते. दरम्यान, संजय गायकवाड यांना आता देवेंद्र फडणवीस यांनीही चोख प्रत्युत्तर दिले आहे. संजय गायकवाड यांच्या टीकेचा समाचार घेताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''संजय गायकवाड यांनी रात्रीची उतरली नसताना पत्रकार परिषद घेतली असावी. मात्र मी त्यांना विनंती करतो की, माझ्या घशात कोरोनाचे किटाणू घालण्याआधी त्यांनी हँडग्लव्हज घालावेत आणि चेहऱ्यावर नीट मास्क लावावा. कारण काय आहे की, मला जनतेचे आशीर्वाद आहेत. त्यामुळे मला काही होणार नाही. मात्र माझ्या माहितीप्रमाणे सामान्य माणसापेक्षा तळीरामांना कोरोना लवकर होतो,'' असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

## दिल्लीत सहा दिवसांचा लॉकडाउन जाहीर

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)-** दिल्लीत गेल्या काही दिवसांपासून करोना रुग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणेवर ताण पडू लागला आहे. तसेच रुग्णांची संख्या दिवासागणिक वाढतच चालली आहे. त्यामुळे करोनाचा फैलाव रोखण्यासाठी दिल्ली सरकारनं सहा दिवसांचा लॉकडाऊन लावण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी रात्रीपासून (१९ एप्रिल) ते २६ एप्रिलपर्यंत कडक निर्बंध लागू असतील. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी राज्यातील जनतेला संबोधित करताना ही माहिती दिली. अरविंद केजरीवाल यांनी राज्यपाल अनिल बैजल यांच्यासोबत चर्चा करुन सहा दिवसांचा लॉकडाऊन लावण्याचा निर्णय घेतला आहे. 'आम्ही चाचण्या कमी केल्या नाहीत



तर वाढवल्या. दिल्लीत रोज १ लाख चाचण्या होत आहे. आम्ही मृत्यूचे आकडेही लपवले नाहीत. आम्ही आत्तापर्यंत कधीही खोटं बोललो नाही. (शेष पृष्ठ २ वर)

## 'संजय राऊत, आधी विधानसभेचे अधिवेशन आयोजित करा' -चंद्रकांत पाटील

**मुंबई (विशाल पाटील)-** शिवसेना नेते संजय राऊत यांनी कोरोनाच्या सद्यस्थितीबद्दल आज जे वर्णन केले आहे तशी गंभीर स्थिती महाराष्ट्रात असून त्याबद्दल चर्चा करण्यासाठी लोकसभेचे नव्हे तर विधानसभेचे विशेष अधिवेशन आयोजित करण्याचा सल्ला त्यांनी आपल्या राज्य सरकारला द्यावा, असा टोला भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी लगावला आहे.

चंद्रकांत पाटील यांनी शिवसेना नेते संजय राऊत यांनी कोरोनाच्या साथीबद्दल बोलताना बेड नाहीत, ऑक्सिजन नाही आणि लसीकरणही नाही, नुसता गोंधळ आहे, असे ट्वीट सकाळी केले आहे. ही अभूतपूर्व स्थिती आहे आणि युद्धजन्य परिस्थिती आहे, सगळीकडे नुसता गोंधळ आणि तणाव आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचे हे म्हणणे अचूक आहे पण ते महाराष्ट्राच्या स्थितीचे वर्णन आहे. संपूर्ण देशात अशी स्थिती नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील स्थितीबद्दल चर्चा करायला थेट लोकसभेचे अधिवेशन बोलावण्याची त्यांची सूचना सध्या तरी योग्य नाही असं म्हटलं आहे. महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू असती तर तसे करणे योग्य झाले असते. सध्या तरी महाराष्ट्रातील



स्थितीवर चर्चा करण्यासाठी विधानसभेचे अधिवेशन आयोजित करणे योग्य होईल. संजय राऊत हे शिवसेना – काँग्रेस – राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारचे एक शिल्पकार आणि या सरकारचे आवाज आहेत. त्यामुळे त्यांनी आपल्या सरकारला या प्रमाणे विशेष अधिवेशनाचा सल्ला द्यावा असं पाटील यांनी म्हटलं आहे.

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावावर लॉकडाऊन हा एकच पर्याय नाही. त्यापेक्षा आरोग्य यंत्रणेसाठी पायाभूत सुविधा वाढविणे आणि प्रभावी उपाययोजानांवर अधिकाधिक भर द्या, अशी मागणी काही दिवसांपूर्वी चंद्रकांत पाटील यांनी व्हिडीओ क्लिपद्वारे केली होती. (शेष पृष्ठ २ वर)

## कोरोनामुळे घडी विस्कटली; नवरा-बायकोची भांडणे वाढली

**मुंबई-** कोरोनाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पुन्हा एकदा कठोर निर्बंध जारी करण्यात आले आहेत. मुळात कठोर निर्बंधांना सर्वत्र तिलांजली देण्यात येत असली तरी वर्षभरापासून लागू असलेल्या लॉकडाऊनमुळे अनेक कुटुंबांची घडी विस्कटली आहे. विशेषतः आर्थिक चणचण आणि अन्य कारणांमुळे घरात भांड्याला भांडे लागण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा छोट्या-मोठ्या कारणांवरून विकोपाला गेलेले वाद थेट कौटुंबिक न्यायालयातपर्यंत दाखल होत असून, येथे दररोज



दाखल होणाऱ्या घटस्फोटांच्या प्रकरणांचा आकडा सुमारे ५० वर जाऊन पोहोचला आहे. गेल्या वर्षी मार्च महिन्यात लागलेल्या लॉकडाऊमुळे अनेकांचे अनेक स्तरावर नुकसान झाले. बऱ्याच जणांच्या नोकऱ्या गेल्या असून, अनेकांचे व्यवसाय डबघाईला आले. अशा आर्थिक आणि मानसिक ताणाचा कुटुंबावर परिणाम होत असून, कौटुंबिक शांतता भंग पावत आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## जगासमोरील संकटाचा सामना करण्यासाठी अमेरिका-चीन आले एकत्र

**सोल (हिंदुस्थान समाचार)- व्यापारासह इतर अनेक क्षेत्रांमध्ये एकमेकांचे स्पर्धक आणि विरोधक असलेले अमेरिका आणि चीन हे पर्यावरण बदलाच्या विरोधात एकत्र आले आहेत. जगासमोरील या संकटाचा तातडीने सामना कण्यासाठी एकमेकांना सहकार्य करण्यास दोन्ही देश तयार झाले आहेत. पर्यावरण बदलाच्या मुद्द्यावर अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन हे लवकरच जागतिक नेत्यांची व्हर्च्युअल परिषद आयोजित करणार आहेत.**



पर्यावरण बदलाबाबत तातडीने हालचाल करण्याची गरज निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे विशेष पर्यावरण दूत जॉन केरी हे चीनमध्ये चर्चेसाठी दाखल झाले असून त्यांनी आज शांघाय येथे चीनचे पर्यावरण दूत शी झेन्हुआ यांची भेट घेतली. या भेटीमध्ये पर्यावरण बदलाविरोधात एकमेकांना आणि इतर देशांना सहकार्य करण्याचा मुद्दा मान्य करण्यात येऊन तसा करारही करण्यात आला. यानुसार, या संकटाचा परिणाम कमी करण्यासाठी तातडीने आणि गांभीर्याने पावले उचलण्याचे ठरविण्यात आले. या बैठकीनंतर दक्षिण कोरियातील सोल येथे पत्रकारांशी बोलताना जॉन केरी म्हणाले की, आम्ही अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर आमचे एकमत झाले आहे. मात्र, शब्दांपेक्षा कृतीवर भरवसा ठेवणे शहाणपणाचे असते. त्यामुळे पुढे काय होईल, हे पहावे लागेल.

पर्यावरण बदलाचा विपरित परिणाम होण्याचा इशारा पर्यावरणवाद्यांनी आणि शास्त्रज्ञांनी वारंवार दिला आहे. जगात सर्वाधिक कार्बन उत्सर्जन करणाऱ्या देशांच्या यादीत चीन प्रथम क्रमांकावर असून त्यानंतर लगेचच अमेरिकेचा क्रमांक आहे. जगातील एकूण कार्बन उत्सर्जनापैकी निम्मे उत्सर्जन हेच दोन देश करतात. (शेष पृष्ठ २ वर)

## आता मुंबई उच्च न्यायालयानं घेतली रेमडेसिवीरच्या तुटवड्याची दखल; केंद्राला नोटीस, राज्यालाही फटकारलं

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** महाराष्ट्रातील रेमडेसिवीरच्या तुटवड्यासंदर्भात आता मुंबई उच्च न्यायालयानेही दखल घेतली आहे. यासंदर्भात न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने, राज्यांना रेमडेसिवीर रेमडेसिवीरदेखाल त्याच प्रमाणात मिळायला हवे, असे न्यायालयाने म्हटले आहे. यासंदर्भात, उच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारलाही फटकारले आहे. जिल्ह्यांना योग्य पद्धतीने रेमडेसिवीरचे वाटप होत




इंजेक्शन कोणत्या आधारे वाटले जात आहे? असा सवाल केंद्र सरकारला केला आहे. तसेच, एकट्या महाराष्ट्रात देशाच्या तुलनेत ४०टक्क्यांहून अधिक कोरोना रुग्ण सापडत आहेत. त्यामुळे त्यांना नाही, असे म्हणत, राज्य सरकारने १३ एप्रिल आणि १८ एप्रिलला नागपूरात रेमडेसिवीरची एकही कुपी का पाठवण्यात आली नाही? असा सवालही केला आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## कुंभ असो वा रमजान, कुठेच करोनासंदर्भातील नियम पाळले गेले नाहीत; शाह यांनी व्यक्त केली नाराजी

**कोलकाता (गणेश बागडे)-** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कुंभ मेळा तसेच मुस्लिमांसाठी पवित्र असणाऱ्या रमजानच्या महिन्यामध्ये करोना नियमांचे पालन केलं जात नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने करोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे सांगत सध्या ज्या वेगाने करोना विषाणूचा प्रसार होत आहे ही गोष्ट अडचणीची ठरु शकते असं मतही शाह यांनी व्यक्त केलं आहे. तसेच सरकारने करोनाच्या दुसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी योग्य निर्णय घेतल्याचंही शाह यांनी सांगितलं.

'कुंभ असो किंवा रमजान असो कुठेही करोनासंदर्भातील नियम पाळल्याचं दिसून आलं नाही. असं वागणं चुकीचं आहे. त्यामुळेच आम्ही आवाहन केलं आणि आता कुंभ प्रातिनिधिक पद्धतीने साजरा केला जातोय,' असं शाह यांनी बोलताना सांगितलं. यावेळी बोलताना शाह यांनी दुसऱ्या करोना लाटेसंदर्भातील निर्णय घेण्यात केंद्र सरकारने उशीर केल्याचा आरोप फेटाळू लावला. केंद्राने उशीरा निर्णय घेतल्याने ऑक्सिजन आणि औषधांचा तुटवडा जाणवला असं आपल्याला वाटत नसल्याचं शाह म्हणाले. शाह यांनी जागतिक स्तरावरील उदाहरण देत, 'जिथे जिथे करोनाची दुसरी किंवा तिसरी लाट आलीय ती आधी आधीच्या लाटेपेक्षा नक्कीच मोठी असल्याचं दिसून आलं



आहे. नवीन प्रकारचा करोना विषाणू आधीपेक्षा वेगाने पसरत आहे. तो कमी घातक असला तरी त्याच्या प्रसाराचा वेग फार आहे,' असं शाह म्हणाले. नवीन प्रकारच्या विषाणूचा अभ्यास शास्त्रज्ञ करत असून त्यांना लवकरच यासंदर्भात यश येईल असा विश्वास शाह यांनी व्यक्त केलं. 'सध्या ज्या वेगाने विषाणूचा प्रसार होत आहे त्यामुळे अडचणी निर्माण होऊ शकतात. मात्र या दुसऱ्या लाटेविरुद्धातील लढाई आपण जिंकू असा मला पूर्ण विश्वास आहे,' असंही शाह यांनी सांगितलं. त्याचप्रमाणे परदेशातून मोठ्या संख्येने प्रवासी येणाऱ्या राज्यांमध्ये करोनाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाल्याचं मतही शाह यांनी व्यक्त केलं. 'पंजाब, गुजरात., महाराष्ट्र, केरळ, दिल्लीष्ठ या सर्व राज्यांमध्ये मोठ्या संख्येने आंतरराष्ट्रीय प्रवास येत असतात,' असं वाढत्या करोना रुग्णसंख्येसंदर्भात बोलताना शाह म्हणाले.

## दिल्ली-NCR सह 'या' ६ राज्यातून महाराष्ट्रात येणाऱ्यांना RT-PCR निगेटिव्ह रिपोर्ट दाखवणे 'अनिवार्य'

**मुंबई (जसबीरकौर भामरा):** देशभरात कोरोनाची दुसरी लाट वेगाने पसरत असताना महाविकास आघाडी सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. परराज्यातून येणाऱ्या प्रवाशांना आता ४८ तासांच्या आतील आयटीपीसीआर चाचणीचा निगेटिव्ह रिपोर्ट सोबत बाळगणे बंधनकारक केले आहे. सरकारने गोवा, उत्तराखंड, गुजरात, केरळ, दिल्ली आणि राजस्थान या राज्यांतून महाराष्ट्रात येणाऱ्या प्रवाशांना आता ४८ तासांच्या आतील आरटीपीसीआर चाचणी करणे बंधनकारक करण्याचा आदेश दिले आहेत. तसेच ज्या प्रवाशांकडे ४८ तासांच्या आतील कोविड चाचणीचा निगेटिव्ह रिपोर्ट नसेल, त्यांची रेल्वे प्लॅटफॉर्मवरच अँटीजन चाचणी करण्याचे आदेश राज्य शासनाने रेल्वेला दिले आहेत.

रेल्वे या ६ संवेदनशील राज्यातून महाराष्ट्रात निघणाऱ्या



एक्सप्रेसची आणि त्यातील प्रवाशांची सर्व माहिती ४ तास आधी राज्य शासनाला कळविणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रवासी महाराष्ट्रातील कोणत्या रेल्वे स्थानकावर उतरणार आहे, याची माहिती रेल्वेने राज्य सरकारला द्यायची आहे. रेल्वेने केवळ आरक्षित तिकीट असणाऱ्यांना प्रवासाची परवानगी द्यावी. आरक्षित तिकीट नसणाऱ्यांना प्रवास करु देऊ नका, असे आदेश राज्य सरकाने अधिसूचना काढत रेल्वे प्रशासनाला दिले आहे.



संपादक:- राकेश शंकर गोरे

# लशींचे राजकीय अर्थकारण

भारताने रशियाच्या 'स्पुटनिक-व्ही' या कोविडविरोधी लसीला नुकतीच मान्यता दिली आहे,मात्र ती भारतात प्रत्यक्षात ऑक्टोबर २०२१च्या सुमारास उपलब्ध होईल. सध्या भारतात उपलब्ध लशींत कोव्हिशिल्डचा वाटा ९० टक्के तर कोव्हॅक्सिनचा १० टक्के आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठ, ब्रिटनस्थित फार्मा कंपनी 'अॅस्ट्राझेनिका' व 'सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' हे कोव्हिशिल्ड ही लस बनवीत आहेत. गेल्या ८५ दिवसांत १० कोटींहून जास्त लशी भारतात दिल्या गेल्या असल्या तरी याच गतीने लसीकरण सुरु राहिल्यास भारतातील सर्व पात्र लोकांचे लसीकरण पूर्ण होण्यास दोन वर्षे लागतील, असा अंदाज आहे. म्हणजे समूह प्रतिकारशक्ती तयार होण्यास बराच काळ जाईल व तोपर्यंत आपणास कोविड संसर्गाच्या लाटांना सामोरे जात राहावे लागू शकते.

भारतात दुसरी लाट सुरु होण्याआधी म्हणजे मार्चच्या मध्यापर्यंत जेवढ्या लशी भारतात दिल्या गेल्या होत्या, त्याच्या दुप्पट परदेशात निर्यात झाल्या. लसीच्या माध्यमातून मैत्रीचे धोरण राबवले जात असताना भारतात दुसरी लाट धडकली नि स्वदेशासाठी लसी वापरण्याचा दबाव येऊ लागला. आता भारत सरकार सिरम इन्स्टिट्यूटकडे मागणी करत निर्यातीवर बंधन ठेवत आहे.

भारत सरकारने कोव्हिशिल्ड निर्मितीत थेट व प्रत्यक्ष आर्थिक योगदान केलेले नसतांना जास्तीत जास्त लशी भारतालाच द्याव्यात, ही भूमिका भारत सरकार घेऊ शकते का हा कळीचा मुद्दा आहे. कोव्हिशिल्डसाठी संशोधन, विकास व निर्मिती करणारे तीन भागधारक आहेत व तिघांमध्ये करार झालेले आहेत. त्या करारांचे पालन करणे 'सिरम'वर बंधनकारक आहे. आतापर्यंत १० कोटी लशी 'सिरम'ने भारताला दिल्यात, तर परदेशात ६.४ कोटी लशी पाठवल्या आहेत. 'सिरम'कडून लशींचा वेळेत पुरवठा होत नाही, म्हणून करारांचा भंग केला, अशी नोटिस 'अॅस्ट्राझेनिका' कंपनीने 'सिरम'ला पाठवली आहे.

कोव्हिशिल्ड पुरवठ्याबाबत आणखी एक मुद्दा आहे. आपण सध्या जसे 'कोव्हिशिल्ड'वर अवलंबून आहोत, तसेच इतरही अनेक देश विशेषतः गरीब देश त्या लसीवर अवलंबून आहेत. कोरोनाचा हैदोस सुरु झाल्यानंतर जागतिक आरोग्य संघटना व ' गावी' (ग्लोबल अलायंस फॉर व्हॅक्सिन अॅड इम्युनायझेशन) यांच्या पुढाकारातून 'कोव्हॅक्स'(कोव्हिड व्हॅक्सिन ग्लोबल अॅक्सेस) ही संस्था स्थापन झाली. सर्व उत्पन्न गटातील देश ह्यात सहभागी झाले. कोरोना लसीचे 'समन्यायी वाटप' व्हावे व गरीब देशांना लसीपासून वंचित राहण्याची वेळ येऊ नये, हे 'कोव्हॅक्स'चे उद्दिष्ट. 'गावी' व 'कोव्हॅक्स'ने सिरम इन्स्टिट्यूटसोबत करार केले आहेत व त्या माध्यमातून ६४ अल्पउत्पन्न देशांना लशींचा पुरवठा 'सिरम'मार्फत होणे ठरलेले आहे. आतापर्यंत 'सिरम'कडून २.८ कोटी लशी 'गावी' व 'कोव्हॅक्स'ला मिळाल्या असून (त्या कोट्यातून भारतालाही वाटा मिळाला आहे) आणखी नऊ कोटी लशी त्यांना एप्रिलअखेरीस देणे ठरलेले होते. त्यास उशीर झाल्याने ते अनेक गरीब देश लशींपासून वंचित राहिले आहेत. ह्या पार्श्वभूमीवर हे स्पष्ट व्हावे, की पुरवठाक्षमतेपेक्षा मागणी जास्त अशी सध्या स्थिती आहे. 'स्पुटनिक'चे आगमन ह्या पार्श्वभूमीवर होत आहे. महिन्याला सहा ते साडेसहा कोटी लशींचे उत्पादन करण्याची



'सिरम'ची सध्याची क्षमता असून ती पुढील काळात २० कोटी लसी प्रतिमहिना होऊ शकते. इथे आणखी एक अडचण आहे. 'सिरम' जरी लशी बनवत असली तरी त्यासाठी कल्चर मीडिया, विशिष्ट रसायने यासारखा कच्चा माल मोठ्या प्रमाणात लागतो

आणि त्यासाठी आपण मोठ्या प्रमाणात अमेरिकेवर अवलंबून आहोत. अमेरिकेने ते निर्यात करण्यावर काही निर्बंध आणले आहेत, याचे कारण खुद्द अमेरिकेलाही लशी बनविण्यासाठी तो कच्चा माल हवा आहे. ह्या मुद्द्यावर 'सिरम'ने भारत सरकारला विनंती केलीय,की भारत सरकारने ह्याबाबत हस्तक्षेप करावा; अन्यथा 'सिरम'ला पुढील काळात लसीच्या निर्मितीत अडचण येईल.

एकूणच ही परिस्थिती लक्षात घेता 'लसीकरणाचे राजकारण नि लसीकरणाचा राष्ट्रवाद ' यास मर्यादा आहेत, याचे कारण कुणीही देश स्वयंभू नाही, हे लक्षात घ्यायला हवे. कोरोना हे असे जागतिक संकट आहे, की त्याचा सामना जगाने एकत्रितपणेच करायचा आहे. प्रत्येक देश कोरोनामुक्त झाला, तरच जग करोनामुक्त होईल. गरीब देशांना लसीपासून वंचित ठेवणे म्हणजे महासाथीला त्या देशात मोकळीक देणे होय. त्यातून त्या देशात विषाणूचा नवा जीवघेणा अवतार तयार होऊन तो अन्य देशांपर्यंत पोहोचून खुद्द लस घेतलेल्यांनाही त्रासदायक ठरू शकतो. म्हणून आपण सगळेच परस्परावलंबी आहोत, हे भान ठेवायला हवे. कुणाला वंचित ठेऊन महासाथीचा मुकाबला करताच येणार नाही. हे टाळायचे असेल तर लशींचे 'समन्यायी वाटप'करणे हे जागतिक धोरण असावे लागेल. दुर्दैवाने जागतिक आरोग्य संघटना त्यात निरुपयोगी ठरल्याचे दिसत आहे. धनवान नि बलवान देशांनी लशींचा ओघ स्वतःकडे वळवला आहे. जगातील १४% लोकसंख्या असणाऱ्या श्रीमंत देशांनी २०२१मध्ये उत्पादन होणाऱ्या ८५% लशी आगाऊ खरेदी करून ठेवल्या आहेत.

# ठाणे, पालघर जिल्ह्यांत शिवभोजन अपुरे!

**ठाणे (तृप्ती गोरे)-** राज्यातील सर्वाधिक स्थलांतर होणारा आणि सर्वाधिक लोकसंख्येचा जिल्हा असलेल्या ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या दीड कोटीच्या घरात असली तरी या जिल्ह्यात अवघी ३० शिवभोजन केंद्रे असल्याची माहिती समोर आली आहे. तर ठाण्याला लागूनच असलेल्या पालघर या आदिवासीबहूल जिल्ह्यात अवघी नऊ शिवभोजन केंद्रे कार्यान्वित आहेत. त्यामुळे या दोन्ही जिल्ह्यांतील गरजूंना राज्य सरकारच्या योजनेचा पुरेसा लाभ मिळत नाही. विद्यमान राज्य सरकारमधील प्रमुख पक्ष असलेल्या शिवसेनेने शिवभोजन थाळीच्या माध्यमातून गोरगरीब, गरजू, कामगार आणि मजुरांना दोन वेळचे जेवण उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला. गतवर्षीच्या टाळेबंदीच्या काळात पाच रुपये दराने शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मजूरवर्गाला या योजनेचा लाभ झाला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी जाहीर केलेल्या टाळेबंदीत कुणाचीही उपासमार होऊ नये म्हणून शिवभोजन थाळी मोफत देण्याची घोषणा केली. मात्र प्रत्यक्षात या शिवभोजन केंद्रांची संख्याच कमी असल्याची माहिती समोर आली आहे. सर्वाधिक स्थलांतर होत असलेला जिल्हा म्हणून ठाणे जिल्हयाची ओळख आहे. ठाणे आणि पालघर या जिल्हयाची २०११ साली सुमारे १ कोटी १० लाख लोकसंख्या होती. सध्या



ठाणे जिल्हयाची लोकसंख्या दीड कोटी असल्याचे बोलले जाते. सर्वाधिक औद्योगिक क्षेत्र, सर्वाधिक मजूर, कामगार वास्तव्यास असलेल्या या जिल्हयात राज्य शासनाने मंजूर केलेल्या शिवभोजन केंद्रांची संख्या अवघी ३० असल्याचे समोर आले आहे. तर पालघर जिल्ह्यात अवघी ९ शिवभोजन केंद्रे सुरू असल्याची माहिती अन्न पुरवठा अधिकाऱ्यांनी दिली आहे.मजूर, कामगारांचे शहर असलेल्या अंबरनाथ शहरात एकही मंजूर शिवभोजन केंद्र नाही. ठाणे जिल्हयात दररोज ६ हजार ७५० थाळी वितरणाला परवानगी आहे. मात्र केंद्र नसल्याने त्या क्षमतेने थाळी दिली जाऊ शकत नाही.

# वसईत संचारबंदीचे तीनतेरा, अन्यत्र चांगला प्रतिसाद; विरार, नालासोपारा रेल्वे स्थानकात प्रवाशांची गर्दी

**विरार/पारोळ (आकाश कांबळे)-** कोरोनाची साखळी तुटावी म्हणून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यात १४ एप्रिल रोजी रात्री ८ वाजल्यापासून ते ३० एप्रिलपर्यंत संचारबंदीचे आदेश दिले आहेत. मात्र, वसई - विरारमध्ये मुख्यमंत्र्यांचे आदेश धाब्यावर बसवल्याचे दिसून आले. पहिल्याच दिवशी कशाचीही तमा न बाळगता बिनधोकपणे फिरत असल्याचे दिसून आले. शासनाच्या नियमांचे उल्लंघन होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त असणे गरजेचे होते. मात्र, तसा पोलीस बंदोबस्तही कोठे दिसून आला नाही. अनेक पोलिसांनाच कोरोनाची लागण झाल्याने पोलीस



लॉकडाऊनचे तीनतेरा वाजले. अपुऱ्या बळामुळे पोलीस हैराण झाले असून, ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्तही तैनात नसल्याने नागरिकांचा मुक्त संचार सुरू होता. विरार आणि नालासोपारा रेल्वे स्थानकात तर प्रवाशांनी सकाळपासूनच गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. लॉकडाऊनचा पहिलाच दिवस नागरिकांनी अक्षरशः धाब्यावर बसवल्याने लॉकडाऊनचे तीनतेरा वाजले. संचारबंदीत नागरिकांच्या वावरावर बंदी असताना नागरिक मात्र बळाची वानवा दिसून आली. त्यामुळे सध्याच्या संचारबंदीत आणि वाढत्या गुन्ह्यांच्या आलेखावर नियंत्रण ठेवण्याची कसरत पोलिसांना करावी लागत आहे. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकारीदेखील हैराण झाले आहेत. संचारबंदीत वाणसामानाची अडचण होऊ नये म्हणून नागरिकांनी सकाळपासूनच रेशन दुकानांत गर्दी केल्याचे चित्र दिसून आले. या ठिकाणी सोशल डिस्टन्सिंगचा फज्जा उडाला.

# वसई-विरारमध्ये नाराजी, धरणांत पाणीसाठा पुरेसा, तरीही पाणीटंचाई

**वसई (सतिश सोनावणे)-** वाढता कोरोना, त्यात एप्रिलचा कडकडीत महिना आणि सोबत उन्हाळा आला की बऱ्याच ठिकाणी पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याचे वास्तव सर्वत्र पाहायला मिळते; परंतु उर्वरित भागांत जरी पाणीटंचाई भासत असली तरी वसई-विरार शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पेल्हार आणि उसगाव धरणात जूनअखेरपर्यंतचा पाण्याचा साठा शिल्लक आहे, तर जिल्ह्यातील सूर्याच्या धामणी धरणात वर्षभर पुरेल इतका समाधानकारक पाणीसाठा असतानाही वसई-विरारच्या काही भागांत पाणीटंचाई असल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. एकीकडे वसई-विरार महापालिका पाणीपुरवठा विभागाने पाणीसाठा समाधानकारक असल्याचे स्पष्ट केले आहे, तर दुसऱ्या बाजूला मात्र पालिका क्षेत्रात पाण्याचे दुर्मिक्ष्य असल्याचे दिसत आहे. याविरोधात काही दिवसांपूर्वी पालिकेवर हंडा मोर्चाही काढण्यात आला होता. दरम्यान, वसई-विरारकरांना पाणीपुरवठा करणारी पालघर व वसई तालुक्यात एकूण तीन धरणे असून, यापैकी धामणी (सूर्या) धरणात आजच्या घडीला ४६ टक्के इतका मुबलक पाणीसाठा आहे, तर पालिकेच्या पेल्हार धरणात ३७ टक्के आणि उसगाव धरणात ४३ टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती पाणीपुरवठा अभियंता सुरेंद्र ठाकरे यांनी बोलताना दिली. त्यामुळे नागरिकांना पावसाळ्यापर्यंत तरी पाण्याचा प्रश्न



भेडसावणार नाही असेच या धरणांतील शिल्लक पाणीसाठ्याच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. सदोष जल वितरण व्यवस्थेमुळे पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. अर्थातच नुसत्या योजना नकोत तर तांत्रिकदृष्ट्या कोणतीही योजना परिपूर्ण झाली नाही. पालिका प्रशासनाने तांत्रिक अडचणी दूर केल्यास नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सुटेल. पेल्हार व उसगाव धरणात जूनअखेरपर्यंत पुरेल इतका साठा आहे, तर धामणी (सूर्या) धरणात वर्षभर पुरेल इतका साठा आहे. तरीही नागरिकांनी पाणी जपून वापरावे.

# टीएमटीची जाहिरात उत्पन्नासाठी धडपड

**ठाणे (दिगंबर जाधव)-** करोना प्रादुर्भावामुळे ढासळलेले उत्पन्न आणि आजूबाजूच्या महापालिकांच्या परिवहन उपक्रमांची तीव्र स्पर्धा यामुळे ठाणे महापालिकेचे आर्थिक उत्पन्न ढासळले आहे. त्यामुळे जाहिरात उत्पन्नाच्या माध्यमातून पुढील तीन वर्षांसाठी १० कोटी ११ लाखांचा निधी उभारण्याच्या दृष्टीने टीएमटी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू झाले आहेत. यापूर्वी टीएमटीकडून जाहिरात उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न केला गेला असला तरी त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने मोठी अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे आता पुढील तीन वर्षांसाठी नव्याने निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. परिवहनच्या ३५० बसेसवर जाहिराती प्रसिद्ध करण्याच्या हक्काच्या वितरणातून हे उत्पन्न मिळवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

ठाणे महापालिकेकडून १९८९मध्ये शहरातील अंतर्गत परिवहन सेवेच्या दृष्टीने परिवहन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. ठाणे शहरात परिवहनचे कळवा, वागळे, आनंदनगर, मुल्लाबाग अशी चार आगारे, ३० बसस्थानके आहेत. ठाणे महापालिकेच्या हद्दीमध्ये परिवहन उपक्रमाचे ४७० बस प्रवासी निवारे आहेत. ठाणे महापालिका हद्द व बाहेरील हद्दीत १०२ मार्गावरून सार्वजनिक प्रवासी वाहतुकीची सेवा टीएमटीकडून



दिली जाते. दररोज सरासरी दोन लाख प्रवासी परिवहन उपक्रमाच्या माध्यमातून प्रवास करतात. परिवहन उपक्रमाच्या बस ताफ्यातील ३० एसी वोल्वो बसेस, चार नॉन एसी मार्कोपोलो बसेस, ११० स्टॅन्डर्ड बसेस, ८० मिडी बसेस, १० मिनी बसेस, जेएनएनयूआरएम अंतर्गत असलेल्या व जुन्या ६६ आणि ५० बसेस तसेच तेजस्विनीच्या ५० बसेस मिळून एकूण ३५० बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्याचे हक्क देण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. १० कोटी ११ लाख ७२ हजार २४ रुपयांच्या दर्शनी किंमतीची ही निविदा आहे. ३ मे पर्यंत ऑनलाइन माध्यमातून त्यामध्ये सहभागी होता येणार आहे.

# ठाणे महापालिकेचं १००० खाटांचं कोविड सेंटर तयार, डॉक्टर्स, नर्सेसविना कोविड सेंटर बंद



**ठाणे (शकिल शेख)-** ठाणे महानगरपालिकेकडे नवीन कोविड रुग्णांसाठी रुग्णालयांमध्ये जागाच उपलब्ध नाही. असे असताना पालिकेने उभारलेली रुग्णालये धूळ खात पडल्याचे चित्र बघायला मिळत आहे. ठाणे महानगरपालिकेच्या वोल्टास कंपनीच्या जागेवरील १००० खाटांचे रुग्णालय रुग्णांच्या प्रतीक्षेत आहे. इथे असलेली अद्ययावत सामग्री, व्हेंटिलेटर आणि ऑक्सिजन पुरवठा असलेले बेड्स आणि इतर सर्व सोयीसुविधा गेल्या अनेक दिवसांपासून तयार करून ठेवले आहेत. मात्र त्यांचा वापर होत नाही. याची दोन कारणे सांगितली जात आहेत. एक म्हणजे ऑक्सिजनचा होत नसलेला पुरवठा आणि दुसरे म्हणजे या ठिकाणी काम करण्यासाठी डॉक्टर आणि नर्स चा असलेला तुटवडा.

पान १ वरुन...

## 'संजय राऊत, आधी विधानसभेचे...

तसेच, यामध्ये स्वयंसेवी संस्थांची देखील मदत घ्यावी, अशी सूचना पाटील यांनी केली आहे. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सर्वच जण चिंतेत आहेत. केवळ आठ दिवस किंवा पंधरा दिवसाच्या लॉकडाऊनमुळे तो संपणार नाही आहे. लॉकडाऊनमुळे त्याचे प्रमाण कमी होईल. पण तो समूळ नष्ट होणार नाही. त्यामुळे तात्पुरता लॉकडाऊन किंवा कडक निर्बंध लागू करण्यासह प्रदीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्याची गरज आहे. त्यासाठी आरोग्य यंत्रणांसाठी पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणात पुरविल्या पाहिजेत असं पाटील यांनी म्हटलं होतं.

## आता मुंबई उच्च...

न्यायालयाने म्हटले आहे, की आम्ही FDA (फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन)च्या जॉइंट डायरेक्टरसोबत बैठक केली. त्यांनी सांगितले, की राज्य पातळीवर एक समिती आहे. ही समिती राज्यांसाठी कुप्यांची संख्या निश्चित करते. सध्या ७ कंपन्या देशात रेमेडेसिविर औषधाचा पुरवठा करत आहे. परिस्थिती पाहता, जेथे कोरोना रुग्णांची संख्या अधिक आहे, अशा शहरांना कंपन्यांनी अधिक रेमडेसिवीर द्यायला हव्या. यात नागपूरचाही समावेश आहे. यासाठी सरकार कंपन्यांना निर्देश देऊ शकते. महाराष्ट्रात दर तासाला जवळपास २,८५९ जणांना कोरोनाची लागण होत आहे. तर प्रत्येक तीन मिनिटांना एकाचा मृत्यू होत आहे. एवढेच नाही, तर राज्यातील एकूण मृतांचा आकडाही ६० हजारच्या वर पोहोचला आहे. गेल्या २४ तासांत येथे ५०३ जणांचा मृत्यू झाला.

## जगासमोरील संकटाचा सामना...

कार्बनच्या वाढत्या प्रमाणामुळे जागतिक तापमान वाढ होते आहे. या दोन देशांनी एकत्र काम करणे अपेक्षित असताना मानवाधिकार भंग, व्यापार, चीनचा वर्चस्ववाद आणि इतर अनेक मुद्द्यांवरून त्यांचे वाद असल्याने संबंध कायमच तणावाचे असतात. आता मात्र, हे वाद बाजूला ठेवून पर्यावरणाच्या मुद्द्यावर एकत्र येण्याचे त्यांनी ठरविले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी २२ आणि २३ एप्रिलला पर्यावरण बदलाच्या मुद्द्यावर व्हर्च्युअल परिषद बोलावली असून त्यात चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासह ४० राष्ट्रप्रमुख सहभागी होणार आहेत. या परिषदेत अनेक देश पर्यावरणाबाबतच्या त्यांच्या उद्दीष्टांमध्ये सुधारणा करून अधिक महत्त्वाकांक्षी लक्ष्य समोर ठेवण्याची शक्यता आहे. चीनने मात्र उद्दीष्टांमध्ये बदल करण्यास नकार दिला आहे.

## दिल्लीत सहा दिवसांचा...

जी परिस्थिती आहे ती नेहमीच जनतेसमोर ठेवली. दिल्लीत गेल्या २४ तासात २३ हजार ५०० रुग्ण आढळले आहेत. दिवसाला २५ हजार रुग्ण मिळत असतील तर आरोग्य व्यवस्था ढासळेल. दिल्लीत १०० पेक्षी कमी आयसीयू बेड आहेत. ऑक्सिजनसाठी केंद्र सरकारला पत्र लिहिलं आहे. एका खासगी रुग्णालयाने तर रात्री तीन वाजता ऑक्सिजन संपला होता असं सांगितलं. मात्र वेळीच उपलब्ध झाल्याने खूप मोठी दुर्घटना टळली. औषधांचा तुटवडा जाणवत आहे. या सर्व गोष्टी पाहता दिल्लीमध्ये परिस्थिती गंभीर आहे.,' असं केजरीवीलांनी म्हटलं.

'दिल्लीमध्ये आतापर्यंत आपण परिस्थिती चांगली हाताळली आहे. दिल्लीतील आरोग्य व्यवस्था सध्या सीमेवर आहे. कोणत्याही यंत्रणेच्या आपल्या मर्यादा आहेत,' असंही त्यांनी सांगितलं. 'दिल्लीमध्ये आणखी रुग्णांना दाखल करून घेणं शक्य नाही आणि लॉकडाउनला पर्याय नाही असं लक्षात आलं आहे. आज रात्री दहा ते पुढील सोमवार संध्याकाळी सहा वाजेपर्यंत लॉकडाउन राहणार आहे. यावेळी मेडिकल, खाण्यापिण्याची दुकानं सुरू राहतील. काय सुरू राहणार व काय बंद यासंबंधी सविस्तर माहिती लवकरच जाहीर करू,' असं अरविंद केजरीवाल यांनी सांगितलं आहे.

## कोरोनामुळे घडी विस्कटली;...

सुरुवातीला छोटे वाटणारे वाद कालांतराने विकोपाला जात असून, नवरा-बायकोची झालेली भांडणे थेट घटस्फोटापर्यंत पोहोचत आहेत. परिणामी गेल्या वर्षभरासह मागील तीन महिन्यांत मुंबईतल्या कौटुंबिक न्यायालयात दररोज दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या सुमारे ५० एवढी असून विविध कारणांमुळे दिवसागणिक यात वाढच होत आहे. भारतीय समाजाची विवाह संस्थाच आज धोक्यात आली आहे. एकट्या मुंबई शहरात हजारो जोडपी घटस्फोट घेऊन विभक्त झाली आहेत. तर, तितक्याच जोडप्यांचा निकाल अजून कौटुंबिक न्यायालयात प्रलंबित आहे. यामुळेच भारतीय विवाह संस्था इतकी खिळखिळी होण्याची नेमकी कारणे शोधणे आज क्रमप्राप्त आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग**
**प्रशासकीय इमारत, १ला मजला, भवन्स कॉलेज जवळ,**
**दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०० ०५८**
Email : northmumbai.ee@mahapwd.com **दूरध्वनी क्रमांक ०२२-२६२३१९६४ फॅक्स- २६२०५७८८**
**द्वितीय मागणी ई निविदा सूचना क्र. ३३ सन २०२०-२१**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग, मुंबई (दूरध्वनी/फॅक्स क्र. २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या खात्याकडून नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम उपनगरे) मजूर सहकारी संस्था मर्यादित, मुंबई, यांच्याकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. स्तंभ ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधित असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करू शकतात.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | उपनगरे |
|---|---|---|---|
| १ | मजासवाडी जोगेश्वरी ५, पोलीस निवासस्थाने इमारत क्र. ३३२ व ७४७ येथील (पूर्व) अ५, ब६, अ, ब६, अ१०, १०, ब१०, क, १३, अ१३ब, अ९, १७, ब९अ, ६+ तळ मजला) ब१७ मजले मुंबई (पूर्व) आणि मेघवाडी जोगेश्वरी पोलीस निवासस्थाने ८० येथील इमारत क्र. ७,८ व ९ तळ मजला ४+मजले ची विशेष दुरुस्ती अंतर्गत इमारती दुरुस्ती व नुतनीकरणाची कामे करणे. | रु. १३,५८,२७५/- | पश्चिम उपनगरे |
| २ | १५६ पोलीस निवासस्थाने टाईप मुंबई येथील (पूर्व), निवासस्थाने मालाड २० आणि ४ व १,२,३ विशेष दुरुस्ती अंतर्गत इमारती दुरुस्ती व नुतनीकरणाची कामे करणे | रु. ८,६९,९२६/- | पश्चिम उपनगरे |
| ३ | २० पोलीस हवालदार निवासस्थाने बोरीवली २-बी, पोलीस अधिकारी निवासस्थानी इमारत क्र. ४० आणि (प.), बोरीवली, पेंटिंग व प्रसाधनगृहाचे नुतनीकरण करणे, अंतर्गत प्लास्टर येथील विशेष दुरुस्ती (प.) | रु. ७,९०,७७०/- | पश्चिम उपनगरे |
| ४ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ९८ शासकीय वसाहत योगीनगर बोरीवली येथील आतील भागाचे प्लास्टर पेंटिंग (पूर्व) आणि इतर अनुषंगिक कामे करणे | रु. २३,५९,६२५/- | पश्चिम उपनगरे |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग, अंधेरी (प.) मुंबई-५८ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. २२/०४/२०२१ ते ०६/०५/२०२१ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे दि. ०७/०५/२०२१**
जा.क्र. काअ/उमुंवि/निविदा/२६९९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग, प्रशासकीय इमारत, १ला मजला
भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई मार्ग अंधेरी (प.), मुंबई- ५८
दिनांक : १५/०४/२०२१

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग करिता
अंधेरी (प.), मुंबई- ५८

**डीजीआयपीआर/२०२१-२०२२/१९४**



Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# मुंबईसाठी पुढील १५ दिवस महत्त्वाचे: काळजी घेण्याची गरज



**मुंबई (दिपेश गोरिवले)-** सध्या राज्यात कोरोनाचा कहर पाहायला मिळत आहे. कोरोनाचा प्रभाव कमी करण्याच्या उद्देशाने राज्यात कडक निर्बंध लादण्यात आले आहेत. मुंबईला या निर्बंधांचा काही अंशी फायदा झाल्याचं चित्र आहे. मुंबई महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात कडक निर्बंध लागू केल्यानंतर रोज कोरोनाबाधितांच्या संख्येत होणारी वाढ ही ८ ते १० हजारांच्या टप्प्यात स्थिरावली आहे. मात्र ही कोरोनाची दुसरी लाट असल्याने पुढील १५ दिवस हे मुंबईच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणार आहेत. एप्रिल अखेरीपर्यंत कोरोनाबाधितांचा रोजचा आकडा थोडा कमी होण्याची शक्यता आहे. परंतु, आजपासून पुढील १५ दिवसांचा काळ हा मुंबईकरांसाठी कसोटीचा असणार आहे, असं मुंबई महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे. याशिवाय गेल्या काही दिवसात केलेल्या मिनी लॉकडाउन, नाइट कर्फ्यू आणि वीकेंड लॉकडाउनमुळे रूग्णांच्या चाचण्या पॉझिटिव्ह येण्याचा दरही २६ टक्क्यांवरून घसरून १५ टक्क्यांवर आला असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने दिली आहे. लॉकडाउन किंवा तत्सम निर्बंध लादण्याआधी राज्यात कोरोना रूग्णांचे प्रमाण बरेच वाढले होते. त्यातील अनेक रूग्णांवर आताही उपचार सुरू आहेत. रूग्णांची संख्या आणि त्यांना लागणाऱ्या वैद्यकीय सेवा यांचे नियोजन करताना महापालिका प्रशासनाची तारांबळ उडताना दिसत आहे. त्यामुळेच महापालिका प्रशासनाकडून सहा अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. वैद्यकीय ऑक्सिजनचे पुरवठादार, पालिकेच्या २४ वॉर्डचे सहआयुक्त आणि अन्न व औषध प्रशासन या तीन विभागांमध्ये समन्वय राखण्याचे कार्य या सहा अधिकाऱ्यांवर असणार आहे, असेही पालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. राज्यात उपलब्ध असलेल्या ऑक्सिजनच्या साठ्यावर नियंत्रण ठेवणं आणि त्याचा योग्य पद्धतीने वापर याची जबाबदारी या सहा अधिकाऱ्यांकडे असेल. सध्या राज्यात खासगी आणि सरकारी अशी एकूण १५० रूग्णालये कोविड रूग्णांवर उपचार करत आहेत.

## कडक निर्बंध कागदावरच; मुंबईत सरसकट सगळेच सुरू

**मुंबई (योगेश होळंब)-** कोरोनाच्या समूळ उच्चाटनासाठी लागू करण्यात आलेल्या कडक निर्बंधांना मुंबईकरांनी गुरुवारी पहिल्याच दिवशी हरताळ फासला. सर्व प्रमुख बाजारपेठांसह छोट्या बाजारपेठा आणि दुकाने सरसकट सुरू होती. दक्षिण मुंबई, पश्चिम उपनगरासह पूर्व उपनगरात सर्वत्र खासगी आणि सार्वजनिक वाहतूकही नेहमीच्याच वेगाने सुरू होती.



रेल्वे आणि बेस्टसह रिक्षा व टॅक्सी वेगाने धावत होत्या. सकाळी आठ वाजल्यापासून ते दुपारी साडेबारा वाजेपर्यंत सर्वत्र सरसकट सुरू असलेल्या व्यवहारांमुळे सामाजिक अंतराचे तीन तेरा वाजल्याचे चित्र होते. पोलिसांच्या गाड्या गस्त घालत असतानाच्या वेळीच कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन केले जात होते. पोलिसांची पाठ फिरताच नियम पायदळी तुडविले जात होते. संध्याकाळसह रात्रीही काही प्रमाणात असेच चित्र होते. दक्षिण मुंबईतील मस्जिद बंदरमधील बाजारपेठ, भायखळा येथील बाजरपेठ, लालबाग मार्केटमधील छोटी मोठी दुकाने, गिरगाव येथील बाजारपेठा, लोअर परळ, करीरोडमधील छोटे, मोठी दुकाने, कुर्ला रेल्वेस्थानकालगतची बाजारपेठ, सांताक्रुझ, घाटकोपर, मुलुंड, बोरीवलीसह मोठ्या रेल्वे स्थानकांबाहेरील बाजारपेठांमधील छोटे, मोठी दुकाने पूर्ण वेळ उघडी होती. दादर मार्केटला तर नेहमीप्रमाणे जत्रेचे स्वरुप आले होते. रेल्वेस्थानकांसह लगतच्या बाजारपेठा आणि त्यातील दुकाने सुरू असतानाच सामाजिक अंतर धुळीस मिळाले होते. जीवनावश्यक गोष्टींचा साठा करण्यासाठी मुंबईकर मोठ्या प्रमाणात बाहेर पडल्याने सकाळी १० ते ११ या वेळेदरम्यान छोट्या आणि मोठ्या बाजारपेठांमध्ये गर्दी होती. भायखळा, कुर्ला, घाटकोपर, मुलुंड, वांद्रे, मुंबई सेंट्रल, अंधेरीसह महत्त्वाच्या रेल्वेस्थानकांवर गर्दी होती. रोजच्या गर्दी एवढे प्रमाण नसले तरी संचारबंदीच्या निर्बंधांचे उल्लंघन कठोर निर्बंधांच्या पहिल्या दिवशी सर्रास करण्यात आल्याचे पहायला मिळाले. बेस्टमध्ये मात्र काही प्रमाणात निर्बंध पाळले जात होते. बहुतांश ठिकाणी धावत असलेल्या बेस्ट बसमध्ये कोणालाही उभे राहून प्रवास करू दिला जात नव्हता. याची सुरुवात बुधवारी रात्रीपासूनच झाली होती. एकंदरच मुंबईचे चित्र पाहता अजून तरी कडक निर्बंधांना गांभीर्याने घेतले नसल्याचेच सर्वत्र पहायला मिळाले.

कोरोनाची साखळी खंडित करण्यासाठी लागू केलेल्या संचारबंदीचे नवी मुंबईमध्ये काटेकोरपणे पालन करण्यात आल्याचे चित्र पहावयास मिळत होते.



# राज्यांतर्गत प्रवासास मुभा

**मुंबई (राकेश गायकवाड)-** एका जिल्ह्यातून अन्य जिल्ह्यात प्रवास करण्यासाठी पासची आवश्यकता नाही. मात्र प्रवास करण्याचे वैध कारण प्रवाशांकडे हवे, अशी माहिती बुधवारी राज्याचे पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी दिली. गेल्या वर्षीच्या टाळेबंदीत पोलिसांच्या ई-पासशिवाय राज्यांतर्गत, राज्याबाहेरील प्रवास करता येत नसे. यंदा राज्य सरकारला ई-पास पद्धत लागू न करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. सरकारने ती मान्य केल्याचे पांडे यांनी सांगितले. त्याशिवाय अत्यावश्यक सेवांशी संबंधित व्यक्ती आणि अत्यावश्यक कामांसाठी नागरिक प्रवास करू शकतील, मात्र प्रवासासाठी त्यांच्याकडे वैध कारण आवश्यक असेल. त्याची झाडाझडती सर्वत्र होईल. तसेच विनाकारण प्रवास करणाऱ्या किंवा घराबाहेर पडणाऱ्यांवर मात्र कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. ८१ टक्के लसीकरण पूर्ण पोलीस दलातील ८१ टक्के अधिकारी, कर्मचाऱ्यांचा प्रतिबंधात्मक लसीचा पहिला तर ४० टक्के दुसरा टप्पा पूर्ण झाल्याची माहिती पांडे यांनी दिली. बुधवारी रात्री आठ वाजल्यापासून सुरू झालेल्या कठोर निर्बंधांच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी राज्य पोलीस दलातील सुमारे दोन लाख पोलीस मनुष्यबळ रस्त्यांवर असेल.

## फास्टॅग सक्ती म्हणजे संचार अधिकार संकोच नव्हे!

**मुंबई (विशाल पाटील)- राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या सगळ्या वाहनांसाठी फास्टॅग सक्तीचा निर्णय हा काही नागरिकांच्या कुठेही संचार करण्याच्या मुलभूत अधिकारावर गदा नाही. शिवाय फास्टॅगचा निर्णय राष्ट्रीय मोटर वाहन कायद्यात दुरूस्ती करूनच घेण्यात आला असून फास्टॅग नसलेल्या वाहनांकडून केली जाणारी दुप्पट शुल्क वा टोल वसूलीही २००८ सालच्या राष्ट्रीय महामार्ग शुल्क अधिनियमानुसारच असल्याचा दावा केंद्र सरकारने उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे केला आहे.**

फास्टॅग सक्तीला अभिजीत खानापुरे यांनी ॲड्. उदय वारुंजीकर यांच्यामार्फत याचिका करून आव्हान दिले होते. न्यायालयानेही त्याची दखल घेत फास्टॅग नसलेली वाहने बेकायदेशीर म्हणायची का? देशातील सगळे महामार्ग हे केवळ फास्टॅग असलेल्या वाहनांसाठीच आहेत असे तुम्हाला म्हणायचे आहे का?, अशा प्रश्नांची सरबत्ती करत केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी फास्टॅग योजनेवर प्रश्न उपस्थित केला होता. तसेच फास्टॅग सक्तीसाठी कायदा वा कायद्यात दुरूस्ती केली आहे का?, अशी विचारणाही केली होती.



त्यावर प्रतिज्ञापत्र दाखल करत केंद्र सरकारने फास्टॅगच्या आपल्या निर्णयाचे समर्थन केले असून राष्ट्रीय महामार्ग हा फास्टॅग असलेल्या वाहनांसाठीच असल्याचेही म्हटले आहे. राष्ट्रीय महामार्गांवरील वाहतूक सुरळीत, गतीने व्हावी, प्रवासाचा वेळ कमी व्हावा हा फास्टॅगच्या निर्णयामागील हेतू असल्याचेही केंद्र सरकारने म्हटले आहे. राष्ट्रीय महामार्गांसाठी फास्टॅग बंधनकारक करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय हा देशात कुठेही संचार करण्याच्या नागरिकांच्या अधिकारांचे उल्लंघन असल्याच्या याचिकाकर्त्यांच्या आरोपाचेही खंडन केले आहे. फास्टॅग नसलेल्या वाहनांसाठी एक मार्गिका आरक्षित ठेवण्याची याचिकाकर्त्यांची मागणी मान्य केल्यास राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागेल, असा दावाही केंद्र सरकारने केला आहे. फास्टॅग नसलेल्या वाहनांसाठी प्रत्येक टोल नाक्यांवर फास्टॅग खरेदीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रयत्न करूनही एखाद्या वाहनात काही कारणास्तव फास्टॅगची सुविधा उपलब्ध केली जाऊ शकत नसेल तर अशा वाहनाला महामार्गावरील फास्टॅगच्या डाव्या मार्गिकेवरून प्रवास करता येऊ शकेल, मात्र त्यासाठी टोल वा दुप्पट शुल्क भरावेच लागेल, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. अशा वाहनांमुळे राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये वा अन्शछ्वय वाहनचालकांची गैरसोय होऊ नये यासाठी वाहतूक मार्शल तैनात करण्यात आले असल्याचेही केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

## कडक निर्बंधांमुळे मुंबईत हवेचा दर्जा सुधारला

**मुंबई (विशाल कारंडे)-** राज्यासह मुंबईत कोरोना रुग्णांची संख्या वाढतेय. त्यामुळे कडक निर्बंध घालण्यात आलेत. त्याचा मुंबईच्या हवेवर चांगला परिणाम झाला आहे. मुंबईत लॉकडाउन लावल्यानंतर हवेत गारवा आणि प्रदूषणाचे प्रमाण कमी नोंदवण्यात आले आहे. लॉकडाउन असूनही रस्त्यावर शासकीय वाहनांसह खासगी वाहनांचीही गर्दी आहे. याचा सर्वाधिक परिणाम प्रदूषणावर होतो.१४ तारखेच्या रात्री आठ वाजल्यापासून लावण्यात आलेल्या निर्बंधांमुळे प्रदूषणाची पातळी कमी झाल्याचे दिसते. अनेक भागात हवेचे प्रदूषण कमी झाले असून समाधानकारक हवेची नोंद करण्यात आली आहे.अनेक ठिकाणी समाधानकारक तर काही ठिकाणी मध्यम हवा गुणवत्ता निर्देशांक नोंदवण्यात आला आहे. बुधवारी रात्री लावल्या गेलेल्या लॉकडाउनमुळे प्रदूषणाची पातळी अधिक घटण्याची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. मुंबईत संपूर्ण शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक शुक्रवारी सकाळपासूनच समाधानकारक नोंदवण्यात आला. कुलाबा, बीकेसी, आणि अंधेरी हे तीन परिसर सोडल्यास मुंबईतील हवा समाधानकारक होती. या तिन्ही परिसरांतील हवा गुणवत्ता निर्देशांक १०० च्या वर नोंदवण्यात आला आणि हवा मध्यम दर्जाची होती. कुलाबामध्ये हवा गुणवत्ता निर्देशांक १४९



मध्यम , बीकेसी ११६, अंधेरी १२४ मध्यम नोंदवण्यात आला आहे. मुंबई शहरातील हवा गुणवत्ता निर्देशांक हा १०० सह समाधानकारक नोंदवण्यात आला आहे. बीकेसी हा मुंबईतील सर्वाधिक प्रदूषित भाग म्हणून ओळखला जातो. मुंबईतील इतर भागातील प्रदूषण कमी असले तरी बीकेसीतील प्रदूषण कायम असल्याचे दिसते येते. पण, कडक निर्बंध लावल्यामुळे लोकांनीही घरी राहणे पसंत केले आहे.

## कोरोना, लॉकडाउनमुळे मुंबई लोकलचे ५०० कोटीचे नुकसान

**मुंबई (सम्यक कासारे)-** कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे २३ मार्च २०२० पासून देशव्यापी लॉकडाउन लागू करण्यात आला होता. त्यामुळे भारतीय रेल्वेची प्रवासी वाहतूक ठप्प पडल्यामुळे २०२० मध्ये ३६ हजार ९९३ कोटी रुपयांचे नुकसान झाले. तर, मुंबई उपनगरीय लोकलसाठी सुमारे ५०० कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. आधीच तोट्यात असलेली भारतीय रेल्वेला कोरोनाच्या दुसऱ्या टप्प्यामुळे



आर्थिक गर्तेत अडकलेली आहे. अनेक विशेष गाड्या रद्द करण्यात येत असल्याने यातून मिळणारे उत्पन्न देखील बुडत आहे. उत्पन्न कसे वाढवावे, तोटा भरून कसा काढायचा असा प्रश्न भारतीय रेल्वेला पडलेला आहे. डिसेंबर २०२० पर्यंत ३६ हजार ९९३.८२ कोटी रुपयांचे नुकसान भारतीय रेल्वेचे झाले आहे. रेल्वेमंत्री पियुष गोयल यांनी नुकताच लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार रेल्वे महसुलात २०१९ च्या तुलनेत ऑगस्ट २०२० अखेरपर्यंत १७ हजार ५७४.६० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले होते. या काळात मालवाहतूक महसुलात ६ हजार ७८५ कोटी रुपयाचा तोटा सहन करावा लागला आहे. हा आकडा डिसेंबर २०२० रोजीपर्यंत ३७ हजार कोटींपर्यंत गेला आहे.

## पालिका रुग्णालयांत ‘अतिदक्षता’ संकट

**मुंबई (नितीन देवळेकर)-** करोनाबाधितांची संख्या झपाट्याने वाढत असून रुग्णालयात खाटा उपलब्ध नसल्यामुळे रुग्ण हवालदिल झाले आहेत. पालिकेच्या डॅशबोर्डनुसार मंगळवारी दुपारी अतिदक्षता विभागात ४५ तर जीवरक्षक प्रणाली सज्ज (व्हेंटिलेटर) केवळ १२ खाटा रिक्त होत्या. त्यामुळे मुंबईच्या आरोग्य व्यवस्थेवर कमालीचा ताण असून खाटा मिळवताना रुग्णांची खूप परवड होत आहे. मुंबईत मार्च



२०२० मध्ये करोनाचा पहिला रुग्ण सापडला आणि त्यानंतर मुंबईत झपाट्याने रुग्णांच्या संख्येत वाढ झाली. रुग्णांना आरोग्य सुविधा मिळावी म्हणून पालिकेने करोना काळजी केंद्र-१, करोना काळजी केंद्र-२, करोना समर्पित आरोग्य केंद्र, करोना रुग्णालये उभारली. काही रुग्णालयांचे खास करोना रुग्णालयांमध्ये रूपांतर करण्यात आले. विलगीकरण सुविधेसाठी हॉटेलमधील खोल्या ताब्यात घेण्यात आल्या होत्या. मुंबईत करोनावर नियंत्रण मिळू लागले आणि रुग्णसंख्या कमी होऊ लागली. त्यामुळे खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी पालिकेने काही संस्थात्मक विलगीकरण केंद्रे बंद केली. टाळेबंदी टप्प्याटप्प्याने शिथिल करण्यात आली आणि हळूहळू मुंबईतील कारभार पूर्वपदावर येऊ लागले.

## कोरोना फैलाव रोखण्यात राज्य सरकार अपयशी

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** कोरोना विषाणूच्या फैलावामुळे सध्या राज्यात बिकट परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोरोनाच्या संसर्गाची साखळी तोडण्यासाठी राज्य सरकारने कडक लॉकडाऊनची घोषणा केली आहे. दरम्यान, राज्य सरकारने लावलेले लॉकडाऊन आणि ठाकरे सरकारच्या कोरोनाकाळातील कारभारावर माजी मुख्यमंत्री आणि भाजपा नेते नारायण राणे यांनी घणाघाती टीका केली आहे.

आज आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत नारायण राणे म्हणाले की, कोरोनाचा फैलाव रोखण्यात राज्य सरकार अपयशी ठरले आहे. राज्यात दिवसाला ६० हजारांहून अधिक रुग्ण सापडत आहेत. हे पाप ठाकरे सरकारचे आहे. देशातील एकूण मृतांपैकी ४१



टक्के रुग्ण हे महाराष्ट्रातील आहेत. राज्य सरकारच्या भोंगळ कारभारामुळे अनेकांचे मृत्यू झाले आहेत, अशी टीका नारायण राणे यांनी केली. तसेच राज्यात कोरोनाला रोखण्यासाठी लावण्यात आलेल्या लॉकडाऊनवरही नारायण राणे यांनी टीका केली आहे. राज्य सरकारने लॉकडाऊन लावून दोन दिवस झाले. पण त्याचा परिणाम दिसत नाही आहे. सर्व शहरांत बाजारपेठा सुरू आहे. लोकांनी गर्दी केली आहे. अनेक घरांत अन्न नाही अशी परिस्थिती आहे. अनेक ठिकाणी दुकाने बंद ठेवल्याने उपासमारिची परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकारने काही घटकांना पॅकेज दिलं आहे. मात्र दीड हजार रुपयांत पाच माणसांच कुटुंब कसं चालेल. पॅकेज जाहीर करायची तयारी सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र सरकार कुणाकुणाला पॅकेज देणार, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## बाळासाहेबांच्या हिंदुत्वाची मशाल सत्तेसाठी विझली, आता धूर दिसतोय; प्रवीण दरेकरांचे टीकास्त्र

**मुंबई (अलीहूसेन शेख)-** राज्यातील कोरोनाची गंभीर परिस्थिती, कोरोना लसींचा तुटवडा, रेमडेसिव्हीर इंजेक्शन, बेड्स, ऑक्सिजन यांची कमतरता, १५ दिवसांसाठी लावण्यात आलेले निर्बंध यावरून विरोधक ठाकरे सरकारवर निशाणा साधत आहेत. मात्र, आता पालघर साधू हत्याकांड प्रकणावरून विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी शिवसेनेवर बोचरी टीका केली आहे. हिंदुत्वाच्या विचारांचा विसर पडल्यामुळे केवळ सत्तेसाठी या प्रकरणांकडे सरकार दुर्लक्ष करीत असून, सत्तेसाठी शिवसेनेच्या हिंदुत्वाची धार कमी झाली असावी, असा आरोप दरेकर यांनी केला आहे.



पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील गडचिंचले गावातील जमावाने दोन साधू व त्यांच्या वाहनचालकाची निघृण हत्या केली होती. या हत्याकांडाला एक वर्ष पूर्ण झाले. या प्रकरणात अद्याप दोषींना शिक्षा झाली नसल्याचा मुद्दा भाजपकडून उपस्थित करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रवीण दरेकर आणि आचार्य तुषार भोसले यांनी मंत्रालयाजवळ लाक्षणिक उपोषण केले. यावेळी ते बोलत होते. पालघर साधू हत्याकांड प्रकरणात तपास पूर्ण करून दोषींना शिक्षेपर्यंत पोहोचवण्याबाबत आवश्यक ती पावले महाविकास आघाडी सरकारने उचलली नाहीत. एक वर्ष पूर्ण झाले तरी या प्रकरणात न्याय मिळू शकलेला नाही, असे प्रवीण दरेकर यांनी म्हटले आहे. प्रवीण दरेकर यांनी या प्रकरणाची चौकशी त्रयस्त एजन्सीमार्फत करण्याची मागणी केली आहे.

## आरोग्य, सुरक्षा अधिक महत्त्वाची!

रमजानच्या पवित्र महिन्यात एकावेळी निदान ५० जणांना मशिदीत जाऊन नमाज पढू देण्याची दक्षिण मुंबईतील जुमा मशिद ट्रस्टची मागणी उच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळली. धार्मिक बाबींच्या आचरणाचा वा सण साजरे करण्याचा अधिकार महत्त्वाचा असला तरी राज्यातील सध्याची करोनाची स्थिती अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे सद्यस्थितीला लोकांचे आरोग्य व सुरक्षा अधिक महत्त्वाची असल्याचे नमूद करत न्यायालयाने ट्रस्टला दिलासा देण्यास नकार दिला. मशीद एक एकर जागेवर उभी आहे. त्यामुळे सात हजार लोक नमाज पढू शकतात.

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम) मुख्य कार्यालय विरार दूरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५६३

**जाहिर नोटिस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | निळेमोरे-७ | NL३०/३७९/२४८ | ४८७३ | सलीम शेख | लुकमान अहमद सिद्दीकी |
| २ | निळेमोरे-७ | NL३०/३६९/१८ | ४८५२ | क्रांती रस्तोगी व क्रिती रस्तोगी | विरेंद्र प्रसाद झुरी पांडेय |
| ३ | निळेमोरे-७ | NL३०/३६२/६९ | ५१६१ | दर्शना वोरा | निलीमा एन. उईके |
| ४ | निळेमोरे-७ | NL३०/१७३/१२ | ५३०१ | जुबेरा अहमद शेख | सना फिरोज खान |
| ५ | निळेमोरे-७ | NL३०/३८७/७६ | ४३५२ | पुनम राजेश गुप्ता व राजेश उमाशंकर गुप्ता | विवेकानंद तिवारी |
| ६ | निळेमोरे-७ | NL३०/३६२/४५ | ४८७२ | एस. एच. इंटरप्रायझेस | राकेश सुभाष बिडलान |
| ७ | निळेमोरे-७ | NL३०/३७०/१०८ | ४८९८ | डी. जी. लॅण्ड डेव्हलपर्स | विवेश हनुमान प्रसाद पांडे |
| ८ | निळेमोरे-७ | NL३०/३४६/७९ | ४८९९ | विनीत व हरेश्वर तावडे | कन्हैया कुमार झा चांदणी झा व वरुण झा |
| ९ | निळेमोरे-७ | NL३०/३७७/३६ | ४८४१ | नंदलाल अयोध्या भाटिया | मायकल मनवेल लोपीस स्मिता मायकल लोपीस |
| १० | निळेमोरे-७ | NL३०/१६५/६ | ४८६९ | मिलींद यशवंत पटेल | यशवंत प्रकाश वेंगुर्लेकर |
| ११ | निळेमोरे-७ | NL३०/३६४/२६ | ४८९७ | रमेश बि. पुरोहीत | बबीता बिपीन चौधरी बिपीन महेंद्र चौधरी |
| १२ | निळेमोरे-७ | NL३०/३०८/९ | ४४८० | प्रकाश विश्वनाथ शिवलकर | विश्वनाथ बबन महाडिक |
| १३ | निळेमोरे-७ | NL३०/३४३/७ | ४६६६ | संजय रामचंद्र ठुकरुल | अर्पणा अनंद हळदणकर तनुजा अनंत हळदणकर |
| १४ | निळेमोरे-७ | NL३०/२८०/६ | ४५३३ | खुशी अपार्टमेंट | प्रसाद दत्ताराम पवार |
| १५ | निळेमोरे-७ | NL३०/३५१/२० | ४५३४ | चंद्रकांत नारायण गिते | लक्ष्मण पांडुरंग दाभोळकर |
| १६ | निळेमोरे-७ | NL३०/२८३/४९ | ४५३१ | अरुण चितरंजण तपादार | तेजस भरत सावंत भाग्यश्री भरत सावंत |
| १७ | निळेमोरे-७ | NL३०/३०२/३६ | ४५४२ | भारत कंस्ट्रक्शन | स्मिता आर प्रभुदेसाई आर. एम प्रभुदेसाई |
| १८ | निळेमोरे-७ | NL३०/३७७/२२७ | ४२५९ | सलीम गुलाब शेख | राजीव जगदीश शुक्ला रंजना राजीव शुक्ला |
| १९ | निळेमोरे-७ | NL३०/३२१/६१ | ४३४४ | अनवर मोहम्मद अली मर्चंड | प्रविणाबेण नविनचंद्र काननी |
| २० | निळेमोरे-७ | NL३०/१६५/७ | ४७५४ | मयुर एम आरते | विशाल विलास शिंदे |

सही/-

(धनश्री शिंदे) सहा. आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)

वसई-विरार शहर महानगरपालिका

जा. क्र. व.वि.श.म./क.वि/२२०/२०२१-२२

दिनांक : १९/०४/२०२१



# नवाब मलिक यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, राज्यपालांकडे मागणी

**मुंबई (योगेश होळंब) :** राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांची राज्य मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा अशी मागणी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे केली. खोटा आरोप करून केंद्र सरकारबद्दल असंतोष निर्माण केल्याबद्दल आणि अफवा पसरविल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नवाब मलिक यांची राज्य मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा आणि त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करा, अशी मागणी चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे एका पत्राद्वारे केली. चंद्रकांतदादा पाटील यांनी म्हटले आहे की, 'केंद्र सरकारने महाराष्ट्राला होणारा रेमडेसिवरचा पुरवठा करण्यास कंपन्यांना मनाई केली, असा खोडसाळ आणि असत्य आरोप नवाब मलिक यांनी ट्वीट करून केला. या त्यांच्या आरोपाच्या समर्थनार्थ एकही पुरावा त्यांनी आतापर्यंत दिलेला नाही. नवाब मलिक यांनी केंद्र सरकारच्या विरोधात असंतोष निर्माण केला, राज्याचा मंत्री असूनही केंद्राच्या विरोधात असंतोष निर्माण करून घटनात्मक चौकटीला नुकसान पोहचवले, कोरोनाच्या महासाथीत अफवा पसरवली तसेच जनतेत भीती निर्माण केली. त्यांच्या या अपराधाबद्दल राज्य सरकारचे घटनात्मक प्रमुख म्हणून राज्यपालांनी नवाब मलिक यांची सरकारमधून हकालपट्टी करावी तसेच त्यांच्या विरोधात पोलीसात गुन्हा नोंदवून कायद्याच्या योग्य कलमांनुसार शिक्षा घडवावी. राज्याचे अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी रेमडेसिवीर इंजेक्शनावरून केंद्र सरकारविरोधात अफवा पसरविल्याचा आरोप भाजपचे आमदार अतुल भातखळकर यांनी केला आहे. भातखळकर यांनी या प्रकरणी मलिक यांच्याविरोधात दिंडोशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मलिक यांनी दोन दिवसांपूर्वी रेमडेसिवीरवरून केंद्रावर गंभीर आरोप केला होता. केंद्र सरकारकडून रेमडेसिवीर निर्यातीवर बंदी घातली गेल्याने भारतातील १६ निर्यातदारांना स्वतःकडे असलेल्या २० लाख रेमडेसिवीरचे इंजेक्शन विकायला परवानगी मिळत नाहीय.

# उद्धव ठाकरेंनी पीपीई किट घालून बाहेर पडावं आणि; चंद्रकांत पाटलांचा सल्ला

**पुणे (अभिजीत येरल्लू)-** राज्यातील करोना संकट दिवसेंदिवस चिंतेत भर टाकत आहेत. राज्यातील दिवसागणिक रुग्णवाढीचा वेग वाढत असून, त्याचा अतिरिक्त भार आरोग्य यंत्रणेवर पडत आहे. राज्यात बेडबरोबरच ऑक्सिजन आणि रेमडेसिवीरचाही तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे राज्याकडून सातत्याने केंद्राकडे मागणी केली जात आहे. राज्यात निर्माण झालेल्या ऑक्सिजनच्या तुटवड्यावरून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना सल्ला दिला आहे.

चंद्रकांत पाटील यांनी पुण्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ठाकरे सरकारवर टीका केली. 'सगळं केंद्रावर फाडून मोकळं व्हायचं. रेमडेसिवीर इंजेक्शन केंद्र. ऑक्सिजन केंद्र. मग तुम्ही काय करता? रेमडेसिवीर इंजेक्शन तयार करायला १९ दिवस लागतात, गुजरात सरकारने तो कालावधी ४ दिवसांवर आणला. तशी वेगळी मशिनरी उभी केली. आता २२ तारखेनंतर खूप इंजेक्शन उपलब्ध होतील, कारण अडीच कोटी इंजेक्शन फॅक्टरीमध्ये तयार आहेत. पण, ती १९ दिवसांशिवाय बाहेर काढता येत नाही. गुजरातने नवीन युनिट उभं केलं आणि ते चार दिवसांवर आणलं. उत्तर प्रदेशात ऑक्सिजन निर्मितीची केंद्र सुरू झाली. महाराष्ट्रात ऑक्सिजन तयार करण्याच्या प्लांटचा पैसा पडून आहे. हे कधी सांगणार? प्रत्येकवेळी केंद्राकडेष्ठ तुमचं काय कर्तृत्व आहे? उद्धव ठाकरेंनी पीपीई किट घालून बाहेर पडावं आणि कारखानदारांच्या भेटीगाठी घ्याव्यात,' असा सल्ला चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्री ठाकरे यांना दिला.

# आता एसटीचे ड्रायव्हर आणणार ऑक्सिजन टँकर

**मुंबई (राजेश गायकवाड)-** रेमडेसिवीर इंजेक्शन, ऑक्सिजन, बेड्सची कमतरता, कोरोना लसींचा तुडवडा यांवरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडताना दिसत आहे. केंद्र आणि राज्य सरकार एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. केंद्राने ऑक्सिजन आणण्यासाठी राज्य सरकारला परवानगी दिली आहे. रेल्वेकडून तर ऑक्सिजन एक्स्प्रेस सोडली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र, ऑक्सिजन आणण्यासाठी राज्य सरकारला ड्रायव्हर मिळत नसल्याची बाब उघड झाली आहे. या पार्श्वभूमीवर आता एसटीचे ड्रायव्हर ऑक्सिजन टँकर आणतील, अशी माहिती परिवहनमंत्री अनिल परब यांनी दिली. अनिल परब यांनी एका पत्रकार परिषदेत याविषयीची माहिती दिली. राज्यात ऑक्सिजनची गरज आहे, त्या ठिकाणी ते पोहोचवण्यासाठी ग्रीन कॉरिडॉर केला जाणार आहे. यामुळे कुठल्याही अडथळ्याशिवाय ऑक्सिजनचे टँकर इच्छितस्थळी लवकर पोहोचतील. कोणत्याही परिस्थितीत ऑक्सिजन टँकर वाहतुकीत अडथळा येणार नाही, अशी ग्वाही अनिल परब यांनी यावेळी दिली.

राज्यात ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे रेल्वे मंत्रालयाकडून ऑक्सिजनचा पुरवठा होत आहे. यासाठी समन्वय साधण्याचे काम



परिवहन विभाग करत आहे. लॉकडाऊनमुळे टँकर्स ड्रायव्हर गावाला निघून गेले आहेत. त्यामुळे ड्रायव्हर्सचा तुटवडा निर्माण झाला आहे. म्हणून परिवहन विभागाचे ड्रायव्हर्स ऑक्सिजनचे टँकर आणण्यासाठी उपलब्ध करून देणार आहोत, अशी माहिती अनिल परब यांनी दिली. ऑक्सिजन व रेमडेसिवीर वितरणाचे अधिकार राज्य सरकारला दिले तर, राज्य सरकार केंद्राकडे कशाला परवानगी मागेल. ज्या गोष्टी केंद्र सरकारच्या हाती आहेत, त्याची मागणी केंद्र सरकारकडेच केली जाणार. दुसरीकडे कोणाला मागणार, असा खोचक सवाल परब यांनी यावेळी विचारला. कोरोना परिस्थितीत परिवहन खाते अतिशय तत्परतेने काम करत आहे. दोन- तीन विषय सध्या आम्ही हाताळत आहोत, असेही परब म्हणाले. दरम्यान, पुण्यातील पुरंदर जिल्ह्यात ऑक्सिजन, रेमडेसिवरचा तुटवडा असून लसीकरणही थांबले असल्याचा दावा करत विजय शिवतारे यांनी संताप व्यक्त केला आहे. रेमडेसिवीरच्या तुटवड्यावरुन आपण ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. कोव्हिड सेंटरमध्ये निकृष्ठ दर्जाचे जेवण दिले जात असल्याची तक्रार करत प्रचंड मोठ्या प्रमाणात ब्लॅक मार्केटिंग सुरू असल्याचा दावाही शिवतारे यांनी केला.

# घराबाहेर पडाल तर खासगी रुग्णालयात दाखल करू -राजेश टोपे

**मुंबई (विशेष प्रतिनिधी)-** ज्या रुग्णांना होम आयसोलेशन म्हणजेच गृह अलगीकरणाचा सल्ला देण्यात आला आहे, ते रुग्ण बाहेर फिरताना दिसत आहेत. त्यांच्यामुळे इतरांना कोरोनाची लागण होत आहे. त्यामुळे अशा रुग्णांनी नियम पाळले नाहीत तर त्यांना खासगी रुग्णालयामध्ये दाखल करावे लागेल व त्याचा खर्चदेखील त्यांनाच करावा लागेल, असा इशारा सार्वजनिक आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिला. राज्यात कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, शासकीय आरोग्य संस्थांमधील खाटांची संख्या वाढवा, ऑक्सिजन, तसेच वातावरणातून ऑक्सिजन निर्मितीची यंत्रणा उभारण्यावर भर देतानाच खासगी रुग्णालयातील कोविड सेंटर्सना ते बंधनकारक करा, पॉझिटिव्ह रुग्णांच्या गृह अलगीकरणाऐवजी संस्थात्मक विलगीकरणावर भर द्यावा. जिल्ह्यांमध्ये आरटीपीसीआर चाचण्यांचे प्रमाण वाढवा, असे निर्देशही आरोग्यमंत्री टोपे यांनी राज्यातील जिल्हा आरोग्य यंत्रणेला दिले.

# हप्ते गृहमंत्र्यांना पोहोचवावे लागतात

## पोलीस निरीक्षकाकडून पाच लाखाची मागणी, सराफाचा आरोप

**सोलापूर (किसन कदम)- गृहमंत्र्यांच्या नावाने बार्शी पोलिसांनी आपल्याकडे पाच लाख रुपयांची मागणी केली, असा धक्कादायक आरोप सोलापुरातील व्यापाऱ्याने केला आहे. पोलीस निरीक्षक संतोष गिरी गोसावी यांनी पैसे मागितल्याचा आरोप सराफ व्यावसायिक अमृतराव गुगळे यांनी केला आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रात कडक निर्बंध लागू आहेत. तरीपण सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील अमृतराव गुगळे या सराफ व्यावसायिकाने चांगमल ज्वेलर्स हे आपलं सोन्याचं दुकान सुरु ठेवलं होतं. राज्य सरकार आणि सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचं उल्लंघन केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांचं दुकान सील केलं. दरम्यान, बार्शी शहरचे पोलीस निरीक्षक संतोष गिरी गोसावी यांनी आपल्याकडे तब्बल ५ लाख रुपयांची मागणी केली. ते देण्यास नकार दिल्याने दुकान सील केल्याचा आरोप सराफ व्यापारी अमृतराव गुगळे यांनी केला आहे. हे सर्व हप्ते गृह मंत्रालयापर्यंत पोहोचवावे लागतात, असंही



पोलीस निरीक्षक संतोष गिरी गोसावींनी म्हटल्याचा आरोप सराफ व्यावसायिकाने केला आहे.

बार्शी पोलिसांनी सराफ व्यावसायिकाचे सर्व आरोप फेटाळले आहेत. अमृता अमृतराव गुगळे यांनी सराफ दुकान उघडून कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भंग केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमृतराव गुगळे यांचे सराफ दुकान चालू असल्याची माहिती आम्हाला मिळाल्यानंतर आम्ही कारवाई केली, असं पोलीस निरीक्षकांनी सांगितलं.

अमृतराव गुगळे यांच्या दोन पुतण्यांविरुद्ध पंधरा दिवसापूर्वी जबरदस्ती जमीन हडपणे आणि सावकारी संबंधित गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्यामुळे पूर्वग्रहदूषित होऊन हे खोटे आरोप केल्याचा दावा पोलीस निरीक्षक संतोष गिरी गोसावी यांनी केला आहे. त्यांच्यावर चारित्र्यहनन केल्याबद्दल लवकरच कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केला होता. मनसुख हिरेन हत्या प्रकरणात नाव आलेले निलंबित API सचिन वाझे यांना अनिल देशमुखांनी महिन्याला १०० कोटी रुपयांच्या वसुलीचं टार्गेट दिलं होतं, असं पत्र परमबीर सिंग यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना दिलं होतं. त्यानंतर देशमुखांच्या सीबीआय चौकशीचे आदेश हायकोर्टाने दिले. त्यामुळे अनिल देशमुख पायउतार झाले, तर दिलीप वळसे पाटील यांच्या खाद्यांवर गृहमंत्रिपदाची धुरा देण्यात आली आहे.

# फडणवीस, दरेकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात विचार -गृहमंत्री

**मुंबई (विशाल कारंडे)-** ब्रुक फार्मा कंपनीच्या अधिकाऱ्याला रेमडीसीवीरच्या साठेबाजी प्रकरणी पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले होते. त्यावेळी त्या ठिकाणी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस,



विधानपरिषद विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर व त्यांचे अन्य सहकारी त्या ठिकाणी पोहचले. याप्रकरणी आता फडणवीस आणि दरेकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासंदर्भात गृहमंत्री यांनी सूचक विधान केले आहे. जर एखाद्या प्रकरणात पोलिसांना चौकशी करावीशी वाटली तर पोलिस कोणालाही बोलावू शकतात, त्या दृष्टीने त्यांना बोलावण्यात आले होते. या ठिकाणी पोलिसांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला गेला. एकप्रकारे शासकीय कामात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशाप्रकारे पोलिसांवर दबाव टाकणं योग्य नाही. या दृष्टीकोनातून या पुढील काळात अशा गोष्टी सहन केल्या जाणार नाहीत. असा इशारा देखील गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिला आहे.

# महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती व फ्रीशिपसाठी अर्ज करण्यास ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ; इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांचा विद्यार्थ्यांना दिलासा

**मुंबई (नितीन देवळेकर)-** १९ च्या पार्श्वभूमी व अडचणी निर्माण होऊन विद्यार्थ्यांना महाडीबीटी प्रणालीवर अर्ज सादर करण्यास विलंब होत आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी शिष्यवृत्ती व फ्रिशिपच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता महाडीबीटी प्रणालीवर अर्ज सादर करण्यासाठी दि. ३० एप्रिल २०२१ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. मंत्री श्री.वडेट्टीवार म्हणाले, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना महाडीबीटी प्रणाली मार्फत राबविल्या जातात. सन २०२०-२१ या शैक्षणिक



वर्षामध्ये विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व फ्रिशिपकरिता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च देण्यात आली होती. मात्र, कोरोना संसर्गाच्या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना महाडीबीटी प्रणालीवर अर्ज सादर करण्यास विलंब होत आहे. हे निदर्शनास येताच विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्ती व फ्रिशिपच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्यास आता दि. ३० एप्रिल २०२१ पर्यंत मुदत वाढ दिली आहे. तरी विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. वडेट्टीवार यांनी केले आहे.

# रेमडेसिवीरचा प्रश्न आता हायकोर्टाच्या दारी, एका संस्थेचे मुख्य न्यायाधीशांना पत्र

**मुंबई (विशाल पाटील)-** सध्या राज्यात रेमडीसीवीरचा तुटवडा निर्माण झाला आहे. तर अनेक कंपन्यांकडे इंडजेक्शनचा साठा पडुन असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर जीवन जगण्याच्या अधिकाराचे रक्षण व्हावे यासाठी राज्यातील रुग्णालयांना रेमडेसिवीर इंजेक्शन उप्लब्ध करुन देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करणारे पत्र मुंबई मानवी हक्क संरक्षण व जागृती संस्थेने हायकोर्टाने मुख्य न्यायाधीश आणि रजिस्ट्रार जनरल यांना पाठवले आहे. या पत्रालाच जनहित याचिका समजून हायकोर्टाने पुढील मागणी संदर्भात योग्य ते आदेश द्यावे अशी विनंती करण्यात आली आहे. महाराष्ट्रात सध्या कोरोनावर उपयुक्त असलेले रेमडेसिवीर इंजेक्शन घेण्यासाठी लोकांना वणवण फिरावे लागत आहे, तरी ते मिळत नाही. हे रेमडेसिवीर इंजेक्शसन न मिळाल्याने अनेकांचे जीव गेले आहेत. या इंजेक्शनचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत आहे. नागरीकांच्या जीवाचे रक्षण व मागेल त्याला आरोग्य सुविधा देणे हे राज्याचे कर्तव्य असतानाही ते




राज्याकडून पार पाडले जात नाही. तसेच काळाबाजार रोख्याकरीता उपायोजना केल्या जात नाही. त्यामुळे मुख्य न्यायाधीशांनी नागरीकांच्या जीवाचे रक्षण करण्याकरीता लोकांना रेमडेसिवीर हे इंजेक्शन त्वरीत रुग्णालयात उप्लब्ध करुण देण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे, अशी माहिती मानवी हक्क संरक्षण व जागृती संस्थेचे सचिव मनिष देशपांडे व संचालक आण्णा जोगदंड यांनी दिली आहे.

# महिलेस अश्लील संदेश, व्हिडीओ पाठवणाऱ्यास मनसैनिकांनी दिला बेदम चोप

**मीरारोड (प्रथमेश चव्हाण)-** एका महिलेस अश्लील व्हिडीओ आणि संदेश पाठवून त्रास देणा-या २२ वर्षीय तरुणास मनसैनिकांनी पकडून बेदम चोप दिला. तसेच त्याच्या तोंडाला काळे फासून लेखी माफी मागायला लावल्याची घटना काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी (दि. १८) घडली आहे. सिंग आडनावाचा हा तरुण मूळचा उत्तर प्रदेशातील असून तो सोमवारी सकाळी उत्तर प्रदेश येथे मूळ गावी जाणार होता. प्राप्त



माहितीनुसार, काशिमीरा प्रभाग १४ मध्ये मनसेचे संपर्क कार्यालय आहे. रविवारी कार्यालयात एक महिला तक्रार घेऊन आली. एक तरुण हा आपणास अश्लील व्हिडीओ व संदेश पाठवून त्रास देत असल्याचे सांगितले. त्यानंतर मनसे पदाधिकारी सचिन जांभळे, सचिन साळुंके, रवींद्र शेलार, करण हरिजन आणि अविनाश शिरसाठ आदीनी त्या तरुणाशी संपर्क साधून त्याला मीरारोड येथून पकडले. त्यानंतर त्याला कार्यालयात आणून बेदम चोप दिला. मनसेच्या महिला पदाधिका-यांनी त्या तरुणाच्या तोंडाला काळे फासले. लेखी स्वरूपात त्याच्याकडून चूक झाल्याचे आणि यापुढे त्रास देणार नाही. तसेच मनसे प्रमुख राज ठाकरे व समस्त महिला वर्गाची माफी मागत असल्याचे लिहून घेतले.

# पुण्यात पोलिस उपनिरीक्षकावर कोयत्याने सपासप वार तर कर्मचाऱ्यांना विटांनी मारहाण, मंगळवार पेठेतील घटना

**पुणे (विशेष प्रतिनिधी)-** सराईत गुन्हेगाराला पकडण्यासाठी गेलेल्या पोलिस अधिकाऱ्यावरच सराईताने कोयत्याने वार केल्याचा प्रकार समोर आला आहे. मंगळवार पेठेत हा प्रकार घडला असून, कर्मचाऱ्याना विटांनी मारहाण केली आहे. पोलीस उपनिरीक्षक नरेश वाडेवाले हे जखमी झाले आहेत. याप्रकरणी कुमार भागवत चव्हाण व प्रतिक पृथ्वीराज कांबळे (दोघेही रा. २५१ मंगळवार पेठ) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर कुमार चव्हाणला पकडले आहे. पण, प्रतीक कांबळे हा पसार झाला आहे प्रतीक हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. मंगळवार पेठेत लावण्यात आलेले शासकीय कॅमेरे हलवले असल्याची माहिती पोलिसांना



मिळाली होती. त्यानुसार उपनिरीक्षक नरेश व त्यांचे पथक या आरोपींना ताब्यात घेण्यासाठी गेले होते. यावेळी प्रतीक कांबळे याने फिर्यादी यांना मारण्याच्या उद्देशाने शिवीगाळ करत आता तुला जिवंत सोडत नाही, असे म्हणत हातातील लोखंडी कोयत्याने त्यांच्या अंगावर वार केले.

# पुण्यात बनावट RTPCR रिपोर्ट बनवणारे रॅकेट उघड

**पुणे (शकिल शेख)-** कोरोनाचे संकट गंभीर होत असताना आता लोकांना वेगवेगळ्या पद्धतीने फसवणाऱ्या टोळ्यासुद्धा कार्यकर झाल्या आहेत. पुण्यात कोरोना चाचणीचे बनावट रिपोर्ट तयार करून देणाऱ्या रॅकेटचा डेक्कन पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या टोळीतील दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. सागर अशोक हांडे (वय २५) आणि दयानंद भीमराव खराटे (वय २१) अशी अटक करण्यात आलेल्या दोघा आरोपीची नावे आहेत. आतापर्यंत केलेल्या चौकशीत या आरोपींनी १५ ते २० लोकांच्या कोविड आरटीपीसीआर चाचण्यांचे बनावट रिपोर्ट तयार करून दिले आहेत. मात्र ही संख्या जास्त असावी असा संशय पोलिसांनी आहे.

डेक्कन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जीनपॅथ डायग्रॉस्टिक इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या लॅबच्या नावाने अज्ञात व्यक्ती कोविड आरटीपीसीआर चाचण्यांचे बनावट रिपोर्ट देत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून आरोपींना अटक केली आहे. या रॅकेटमध्ये आणखीही काही आरोपींचा समावेश असण्याची शक्यता आहे. पोलिस त्यांचा शोध घेत आहे. नागरिकांनी कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर विश्वास न ठेवता मान्यताप्राप्त



लॅबमधूनच चाचणी करून खात्रीशीर रिपोर्ट घ्यावे, अ आवाहन पोलिसांनी केले आहे. दरमन्यान या आरोपींनी अजून काही इतर गुन्हे केले आहेत का याचा तपास पोलिस करत आहेत.

# बेवारस मृतदेह



बेवारस मयत इसमः मुस्लिम अंदाजे वय ४० वर्ष, वर्णनःउंची ५ फूट ८ इंच, बांधाः सडपातळ गालावर जुन्या जखमेची खून

**दि.०७/०४/२०२१ रोजी बांद्रा टर्मिनस, निर्मल नगर पोलिस ठाणे, खार (पू). मुंबई यांना सदर इसमाचा मृतदेह मिळाला आहे. कोणी नातेवाईक आढळून आल्यास कृपया त्वरित पोलिस ठाणे येथे संपर्क करा,**

फोन : ०२२२६४७९३७२

सुशांत कुमार पाटील ( पोलिस उप निरीक्षक, निर्मल नगर पोलिस ठाणे )